# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार

क्र.रामाआ/तक्रार/४५५/२०२४/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.खंडू निवृत्ती बेंडकोळी,मु.पो.धोंडेगाव, ता.जि.नाशिक | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगाव, ता.जि. नाशिक |

सुनावणी दिनांक-१२/०८/२०२५

तक्रारदार यांनी दि.०७/०८/२०२४ रोजीच्या अर्जान्वये," द्वितीय अपिल क्रमांक-३२००/२०२१/नाशिक प्रकरणी मा.आयोगाने पारीत केलेल्या आदेशानूसार जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीही कागदपत्रे दिलेले नसून, आपल्या आदेशाचे पालन केलेले नाही. तरी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही व्हावी.संबंधितांना फेरआदेश व्हावेत व त्यांचेकडून मला सर्व कागदपत्रे मिळावीत." असे नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ अंतर्गत आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१२/०८/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी — तक्रारदार,तक्रारदारातर्फे प्रतिनिधी व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून, तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०३/०७/२०२१ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २०२० ते सन २०२१ या कालावधीतील प्रोसिडींग ठराव निरीक्षणाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१)दलीत वस्ती सुधारणा ठराव प्रती,

२)रस्ते,गटारी,पाणी योजना या कामांच्या ठराव प्रती,

३) केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, जिल्हा परीषद, पंचायत समिति यांच्याकडून आलेला निधी, वापरलेला निधी, उर्वरीत यांची माहिती

४)डेडस्टॉक रजिस्टर प्रती,

५)ऑडीट रिपोर्ट प्रती,

६)कामांच्या व्यवहार नोंदी प्रती तसेच झालेली कामे इस्टिमेट ऑल ऑर्डर ठराव प्रती,

७)ग्रामपंचायत कर्मचारी संख्या व त्यांचे वेतन श्रेणी किती (मासिक व पदनाम यांच्याविषयी माहिती)

८)१४ व्या व १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधी,खर्च,शिल्लक निधी प्रती,

९)ग्रामनिधी जमा खर्च, शिल्लक निधी प्रती,

१०)दलित वस्ती करीता प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रती तसेच,

११) पेसा आयोगातंर्गत प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रत याबाबतची माहिती."

४.	आयोगाने, द्वितीय अपिल क्र.३२००/२०२१/नाशिक संदर्भात आयोगासमोर दि.०२/०८/२०२२रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २०/०९/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

*"विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दि वसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी.अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेउन आवश्यक माहिती विनामूल्य व्यक्तीशः पुरवावी."*

५.	सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, तक्रारदार यांच्या दिनांक ०३/०७/२०२१ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, कार्यालयाच्या दिनांक २३/०७/२०२१ च्या पत्रान्वये तक्रारदार यांना माहितीसंदर्भात शुल्क भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे व सदर पत्राची प्रत आयोगास सादर केलेली आहे.त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक १७/०८/२०२१ रोजी माहिती शुल्क भरल्यानंतर कार्यालयाच्या दिनांक २०/०८/२०२१ च्या पत्रान्वये आपण अनेक विषयांची मागणी केलेली असलेने प्रथम विषयाची माहिती सोबत सादर करण्यात येत असून, इतर विषयांसाठी स्वतंत्र अर्ज करावा, असे तक्रारदार यांना कळविण्यात आले आहे व सदर पत्राची प्रत आयोगास सादर केलेली आहे.

६.	सुनावणी दरम्यान सादर केलेला युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, व्दीत्वीय अपील क्र.३२००/२०२१/नाशिक संदर्भात आयोगाने दि.२०/०९/२०२२ अन्वये पारित केलेल्या आदेशांनुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१)	विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,धोंडेगाव, ता.जि.नाशिक, यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत द्वितीय अपिल क्र. ३२००/२०२१/नाशिक मध्ये आयोगाने दिनांक २०/०९/२०२२ अन्वये पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२)	द्वितीय अपिल सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,धोंडेगाव, ता.जि.नाशिक(दि.०२/०८/२०२२ रोजी कार्यरत) यांनी आयोगाकडील द्वितीय अपिल क्र. ३२००/२०२१/नाशिक मध्ये आयोगाने दिनांक २०/०९/२०२२ अन्वये पारीत केलेल्या आदेशास अनुसरुन माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३)	वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्र.४५५/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत:-मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करून पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करून अहवाल ३० विसांचे आत सादर करावा.

जावक क्र. ८८०४	19 NOV 2025